# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट १९८-२२ दि.०१-०७-२२

## ०३ पिडीत मुलींची वेश्या-व्यवसायातुन सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश.

दि.३०.०६.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, साक्षी ही महिला मिरा-भाईंदर परिसरातील तिचे संपर्कात असणारे पुरुष गिऱ्हाईकांना मुलींचे फोटो पाठवून गिऱ्हाईकांच्या पंसतीनुसार वेश्यागमनाच्या मोबदल्यात मिरा-भाईंदर परिसरातील लॉजवर मुली पुरविते.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व पंच यांना मॅकडोनाल्ड हॉटेल समोरील रोडवर, कनकिया रोड, मिरारोड पूर्व येथे पाठवुन सत्यता पडताळ्ली व पोलीस पथकासह १७.४० वा. छापा टाकला असता महिला वेश्यादलाल लता उर्फ साक्षी शिंगारे हिने ०३ मुलींना दाखवुन बोगस पुरुष गिऱ्हाईकाकडुन वेश्यागमनाची एकुण रु. ६,६४०/- रक्कम स्वीकारल्याचे तिचे अंगझडतीत मिळुन आले. त्यानंतर सापळयातील रोख रक्कम मद्देमालासह ताब्यात घेवुन ०३ पिडीत मुलीची सुटका करण्यात आली आहे. सदर घटनेबाबत सपोनि/उमेश पाटील यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने महिला आरोपीविरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. I २६३/२०२२, भा.दं.वि.सं.कलम ३७० अ. व्या. प्रति. अधि. १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उपआयुक्त, (मुख्यालय), अतिरिक्त कार्यभार (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली .श्री देविदास हंडोरे/पो.निरिक्षक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर, सपोनि/तेजश्री शिंदे भरोसा सेल, सपोउपनि/उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पोशि/केशव शिंदे, मपोहवा/सुप्रिया तिवले व चा.पोहवा/सम्राट गावडे यांनी केली आहे.

......ooooo......